# कुरळप मधील उपेक्षीत स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य : विशेष संदर्भ सविनय कायदेभंग चळवळ

**अभय मनोहर गायकवाड,** संशोधक विद्यार्थी, मु.पो. बहिरेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

abhaygaikwad94@gmail.com

---

इ.सन. १९५७ च्या प्लासीच्या लढाईपासूनच भारत इंग्रजांच्या साम्राज्यवादी वृत्तीला विरोध करू लागला होता. पण तरीही हळुहळु भारतामध्ये पाय रोवण्यामध्ये इंग्रज यशस्वी होत गेले. दुसऱ्या बाजूला भारतीयांच्या मनामध्ये वसाहतवादी ब्रिटिश राजवटी विरुध्द असंतोष साचत चालला होता. पुढे जाऊन १८५७ ला त्याचा उद्रेक झाला. १८५७ चे बंड घडून आले. इंग्रज ते बंड मोडून काढण्यामध्ये यशस्वी झाले. सावध झालेल्या ब्रिटिशांनी सत्तेची खांदेपालट केली. ब्रिटिश ईस्ट् इंडिया कंपनीकडून सत्ता थेट ब्रिटिश पार्लमेंटच्या हातामध्ये गेली. याने भारतीयांच्या जीवनामध्ये फारसा काही बदल झाला नाही. परकीय सत्तेच्या विरुध्द् अधून-मधून छोटे-मोठे उठाव होत राहिले. पुढील काळामध्ये लोकमान्य टिळकांनी भारतीयांच्या मनामध्ये ब्रिटिश राजवटी विरुध्द असंतोष निर्माण करत राष्ट्रवादाची ठिणगी टाकली. १९२० ला लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर स्वातंत्र्यलढयातील महात्मा गांधीजींचे महत्व वाढत गेले. १९२० च्या असहकार आंदोलनानेही भारतीयांमध्ये उत्साह निर्माण केला होता मात्र ५ फेब्रुवारी १९२२ ला चौरीचौरा येथे घडलेल्या घटनेमुळे महात्मा गांधींनी असहकार आंदोलन तातडीने मागे घेतले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीने आणि १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाने दिल्लीपासून गल्लीपर्यंत परकीय सत्तेविरुध्द प्रखर असंतोष निर्माण केला. भारतातील लाखो स्वातंत्र्यसैनिक विविध मार्गाने परकीय सत्तेविरुध्द लढा देऊ लागले. या लढयामध्ये तत्कालीन सातारा जिल्हयातील कुरळप गावाने आपले अनन्यसाधारण योगदान दिले.

## सविनय कायदेभंग चळवळीचे स्वरुप

३१ डिसेंबर १९२९ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे भरलेल्या अधिवेशनामध्ये महात्मा गांधींनी सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचा ठराव मांडला.[१] अपेक्षेप्रमाणे ठराव पास झाला. १४ फेब्रुवारी १९३० रोजी साबरमती आश्रमामध्ये झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.[२] सविनय कायदेभंग करण्यासाठी विविध मार्ग अवलंबिण्यात आले. त्यामध्ये १) मीठाचा सत्याग्रह २) शासकीय शिक्षण संस्थांवर बहिष्कार ३) परदेशी मालांवर बहिष्कार ४) दारू, अफूची विक्री करणाऱ्या दुकानांवर निदर्शने ५) करबंदी ६) सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार ७) जंगल कायद्याचा भंग करणे या गोष्टींचा समावेश होता.[३]

सरकारने मीठावर लावलेला कर हा अप्रत्यक्ष स्वरुपाचा होता. मात्र वनचराईसाठी लावलेला कर हा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भरावा लागत असे. ब्रिटिश आमदनीपूर्वी असे कर घेतले जात नव्हते. लोक जंगलातून गवत, लाकूडफाटा मिळवून त्यावर गुजराण करत. चारा, लाकूड ही गरीब शेतकऱ्यांची गरज बनली होती. ब्रिटिश सरकारने जंगलावर कर लादल्याने गरीब शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. मुंबई इलाख्याच्या फक्त ७० लाख जंगल उत्पादनासाठी इंग्रज सरकार गोरगरीब रयतेवर जुलूम करत होते[४] ही गोष्ट खेडयापाडयातील लोकांच्या लक्षात आली आणि म्हणून त्यांनी संगमनेर येथे २२ मे १९३० रोजी जंगल सत्याग्रहाच्या शिबीराला हजेरी लावली.[५] यातून पुढे महाराष्ट्रात संगमनेर, चिरनेर, नंदूरबार, शिंदखेड व बिळाशी येथे जंगल सत्याग्रह घडून आले. सातारा जिल्हयातील शिराळा पेठयातील 'बिळाशी जंगल सत्याग्रह' १८ जुलै १९३० ते ५ सप्टेंबर १९३० असा सलग ५० दिवस चालला.[६]

## बिळाशी जंगल सत्याग्रहामधील विष्णू जोती पाटील यांचे योगदान

कायदेभंग कमिटीच्या कार्यक्रमानुसार केवळ गवत कापून तुरुंगात जाण्यापेक्षा काहीतरी मोठे कार्य करावे असे शिराळा पेठयातील कार्यकर्त्यांना वाटू लागले. बिळाशीतील बहिरोबाच्या मंदिरामध्ये झालेल्या बैठकीत बेत ठरला. सागवानाचा सोट कापून आणून तो बिळाशीतील रामेश्वर मंदिरासमोरील आवारात रोवायचा आणि त्यावर तिरंगी झेंडा फडकवायचा. ठरल्याप्रमाणे दीड-दोन हजार लोक घोषणा देत व गाणी म्हणत कुसाईदेवीच्या देवळानजीक असलेल्या अस्वलदऱ्यातून चाळीस फूट उंचीचा सागवानाचा सोट घेऊन आले व देवळासमोर आधीच खणून ठेवलेल्या खड्यात

सोट उभा करून त्यावर काँग्रेसचा तिरंगी ध्वज फडकविण्यात आला.[७] श्री. बाबूराव चरणकर, साथी गणपतराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली हा लढा संपन्न होत होता.[८] जंगल सत्याग्रह यशस्वी झाला. एका अर्थाने त्या भागातील ब्रिटिश सरकारचा अंमल संपला की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. गावामध्ये साजरे केले जाणारे सर्व सण ध्वजस्तंभाच्या साक्षीने साजरे होऊ लागले होते.

इंग्रज सरकारच्या आदेशाने बिळाशी गावच्या पोलीस पाटलाने गावकऱ्यांना ध्वज काढण्यास सांगितला पण गावकऱ्यांनी त्यांचे मानले नाही. पुढे एके दिवशी फौजदार बंकटसिंग ५० पोलिसांना सोबत घेऊन बिळाशीमध्ये आला. पण कार्यकर्त्यांमधील एकीमुळे त्याला मोकळया हाती परत फिरावे लागले. गावचा पोलीसपाटील लक्ष्मण पाटील याने गावातील प्रत्येक गोष्टीचे रिपोर्टींग शिराळयाला केल्याने ५ सप्टेंबर १९३० ला एकनाथी भागवत सप्ताहाच्या पाचव्या दिवशी सकाळी ग्रंथ वाचन सुरू असतानाच बहिरोबाच्या देवळाजवळ पोलिसांच्या गाडयांची रांग लागली. सहाशे ते सातशे लाठीधारी, बंदूकधारी पोलिसांनी ध्वजस्तंभाभोवती कडी करून उभारलेल्या जमावावर अमानुष लाठीचार्ज केला, काहींना बुटाने तुडवले, काहीना जागीच ठार केले. याही परिस्थितीमध्ये मागे न हटता मैनाबाई धनगर, मुक्ताबाई साठे, राजूबाई कदम-पाटील, धोंडूबाई मस्क्रर यांनी झेंडयाला मिठ्या मारल्या. ब्रिटिशांनी रक्तबंबाळ करुनही स्त्रियांनी झेंडा सोडला नाही. ब्रिटिश फौजेने सत्याग्रहींची धरपकड सुरू केली. बाबुराव दादा चरणकर, बापूसाहेब देशमुख, तुका माळी, पांडू भोसले, मुरा रोकडे, श्रीपती सावंत, गणपतराव निकम, गोपाळा गोविंद पवार आणि त्याचबरोबर कुरळपचे विष्णू जोती पाटील या स्वयंसेवकांना पकडून मोटारीत घातले[९] व सर्व मोटारगाडया शिराळयाच्या दिशेने निघून गेल्या. बाबुराव दादा चरणकर, रंगनाथ दांडेकर, बापूसाहेब देशमुख, विष्णू पाटील कुरळपकर अशा एकूण एकोणचाळीस सत्याग्रहींवर खटले भरले.[१०] यातील कुरळपच्या विष्णू जोती पाटील यांच्यावर ३५३ व १४७ या कलमाखाली प्रत्येक आरोपाबद्दल सहा महिने कैद व शंभर रुपये दंड व हा दंड न दिल्यास दोन महिने जादा कैद अशी शिक्षा सुनावण्यात आली. या शिक्षेविरुध्द अपील करून आरोपीतर्फे साताराचे प्रख्यात वकील दादासाहेब करंदीकर यांनी मोफत वकीलपत्र घेऊन खटले चालवले.[११] त्यामुळे सत्याग्रहींना अल्पस्वरुपाच्या शिक्षा झाल्या.बिळाशी आणि परिसरातील शेतकऱ्यांनी केलेल्या या जंगल सत्याग्रहाची सरकार दरबारी 'बिळाशीचे बंड' म्हणून नोंद झाली. त्याचबरोबर 'बिळाशीच्या बंडाची' चर्चा लंडनच्या पार्लमेंटमध्ये प्रश्नोत्तर रूपाने झाली.[१२] यावरून बिळाशीच्या जंगलसत्याग्रहाचे महत्व अधोरेखित होते.

**सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी कुरळप मधील स्वातंत्र्यसैनिक**

1. **विष्णू जोती पाटील:** १९०९ मध्ये जन्मलेल्या विष्णू पाटील यांचे मूळ गाव कुरळप हे होते. कुरळपमध्ये जन्मलेले विष्णू पाटील स्वातंत्र्याच्या विचाराने भारावून गेले होते. त्यांनी आपले शालेय शिक्षण सातव्या इयत्तेपर्यंत पूर्ण केले. मात्र स्वातंत्र्यासाठी स्वत:ला वाहून घेतलेल्या विष्णू यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. १९३० सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत बिळाशी येथील जंगल सत्याग्रहात भाग घेतल्याने विष्णू यांना सहा महिने सक्तमजूरी आणि २०० रुपये दंड अशी शिक्षा झाली.[१३]

2. **निवृत्ती आकाराम पाटील (काका):** यांचा जन्म १९०२ साली झाला. वाळवा तालुक्यातील कुरळप हे मूळ गाव असलेले निवृत्ती काका कुरळप गावामधील सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे नेतृत्व करत. १९३०-३१ सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी देशप्रेमाने भारावून जाऊन विविध सभा-मिरवणुकांमध्ये भाग घेतला.[१४] सविनय कायदेभंग करत ते जंगल सत्याग्रहामध्ये सहभागी झाले. दारू पिकेटिंगच्या कार्यातही त्यांनी भाग घेतला.

3. **महादेव यशवंत पाटील (आण्णा):** यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. वाळवा तालुक्यातील कुरळप हे मूळ गाव असलेल्या महादेव पाटील यांनी सातवीपर्यंत शिक्षण घेतले. कुरळपमधील सर्व लोक त्यांना आण्णा या नावाने ओळखत होते. लहानपणी पितृछत्र हरपलेल्या आण्णांनी पुढे जाऊन स्वातंत्र्याच्या कार्यामध्ये स्वत:ला वाहून घेतले. १९३० सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी अनेक सभा-मिरवणुकांमध्ये सहभाग घेत देशकार्य केले. सविनय कायदेभंग करत आण्णांनी जंगल सत्याग्रह केला. त्याचबरोबर दारूगुत्त्यावर पिकेटिंग करण्यातही त्यांनी आपला सहभाग नोंदवला.[१५]

देशकार्यामध्ये स्वत:ला वाहून घेतलेल्या आण्णांनी स्वत:च्या घरावर मात्र तुळशीपत्र ठेवले. लहानपणीच वडिलांचे निधन झाले असताना घरची जबाबदारी बाजूला ठेवत देश स्वातंत्र्याची जबाबदारी स्विकारणारे आण्णा खरे

देशभक्त होते. आण्णांच्या माघारी कुटुंबाला मात्र फार हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. आण्णांची आई व आज्जी यांना उदरनिर्वाहासाठी वडाराच्या हाताखाली दगड फोडण्याचे काम करावे लागले.[१६]

आण्णा भूमीगतपणे कार्य करत असल्याने पोलिसांचा ससेमिरा असे. आण्णांना पकडण्यासाठी, त्यांची चौकशी करण्यासाठी सतत पोलिस घरी येत असत. एखादेवेळी आण्णा घरी असताना पोलिस आल्यास घरातील लोक त्यांना रचलेल्या शेणींमध्ये लपवून ठेवत. देशप्रेमामध्ये स्वत:ला वाहून घेतलेल्या या स्वातंत्र्यसैनिकाचे देहावसान ६ नोव्हेंबर २००१ रोजी वाळवा तालुक्यातील कुरळप येथे झाले. अशा या पराक्रमी स्वातंत्र्यसैनिकाचा सन्मान १५ ऑगस्ट १९६६ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची स्वाक्षरी असलेल्या सन्मानपत्राने करण्यात आला.[१७] पुढे एक ताम्रपट देऊन त्यांना शासनाने गौरविले.[१८]

**4. आक्कुबाई बाबाजीराव माळी:** मूळ गाव कुरळप असणाऱ्या आक्कुबाईंचा जन्म १८९५ मध्ये आजच्या सांगली जिल्हयामधील वाळवा तालुक्यामध्ये झाला. स्वातंत्र्यलढयाची समृध्द पार्श्वभूमी असलेल्या तत्कालीन सातारा जिल्हयामध्ये देशप्रेमाने वातावरण भारावून गेले होते. खेड़या-पाड़यातील लाखो लोक रस्त्यावर उतरून स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होऊन लागले होते. कुरळपच्या आक्कुबाईनाही या स्वातंत्र्यलढयापासून स्वत:ला लांब ठेवता आले नाही. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रेमापोटी आक्कुबाई १९३० साली पुकारलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाल्या. स्वातंत्र्यलढयामध्ये होऊ घातलेल्या अनेक सभांमध्ये त्यांनी सहभाग घेतला. स्वातंत्र्याचा जागर करणाऱ्या अनेक प्रभात फेऱ्यांमध्येही त्यांनी हिरीरीने भाग घेतला. देशसेवेचे हे कार्य करत असताना एके दिवशी कुरळप येथे त्यांना पोलिसांकडून मारहाण सहन करावी लागली.[१९] कुरळपमधील ज्ञात स्वातंत्र्यसैनिकांपैकी आक्कुबाई या एकमेव महिला स्वातंत्र्यसैनिक आहेत की, ज्यांनी सविनय कायदेभंग चळवळीमध्ये सहभाग घेत स्वातंत्र्यलढयामध्ये आपले योगदान दिले.

**5. रामचंद्र दादू चौगुले:** रामचंद्र चौगुले यांचे मूळ गांव आजच्या सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील कुरळप हे आहे. त्यांचा जन्म १९१२ मध्ये झाला. चौथीपर्यंत शिक्षण घेतलेल्या रामचंद्र चौगुले यांना स्वातंत्र्यलढयाविषयी प्रखर आकर्षण होते. या आकर्षणातून ते महात्मा गांधींनी पुकारलेलया सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये आकर्षिले गेले. भारताला स्वतंत्र करण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या त्या अनेक तरुणांमध्ये रामचंद्र चौगुलेही सहभागी झाले. १९३० साली झालेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी अनेक सभांमध्ये भाग घेतला. प्रभातफेऱ्यांमध्ये सहभागी होत त्यांनी स्वातंत्र्याचा जयघोष केला. इंग्रज राजवटीला न जुमानणाऱ्या रामचंद्र चौगुलेंना इंग्रजपीडा न मिळते तो नवल. ब्रिटिश पोलिसांच्या हाती लागल्यावर त्यांना दोन रुपये दंड अथवा दोन दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात आली.[२०] राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेल्या रामचंद्र चौगुलेंनी दंड नाकारला आणि दोन दिवसांची कैद सहन केली.

**6. हरी भाऊ थोरात:** १९१२ साली जन्मलेल्या हरी भाऊ थोरातांचे कुरळप हे मूळ गाव होते. १९३० सालच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या निमित्ताने सारा देश पेटून उठला होता. त्याची ज्वाला तत्कालीन सातारा जिल्हयातील कुरळप या छोटयाशा गावापर्यंत येऊन पोहोचली होती. कुरळप मधील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी कायदेभंगाच्या चळवळीमध्ये उडी घेऊन आपापल्या परिसरामध्ये लढा उभारला. हरी भाऊ थोरात हे तर सातारा येथे झालेल्या झेंडा सत्याग्रहामध्ये सहभागी झाले. आपल्या इतर सहकाऱ्यांच्या बरोबरीने त्यांनी झेंडा सत्याग्रहामध्ये हिरीरीने भाग घेत स्वातंत्र्याचा जयघोष केला. पुढे पोलिसांनी लावलेल्या चौकशीमध्ये हरी भाऊ थोरात यांचा साताराच्या झेंडा सत्याग्रहातील सहभाग सिध्द झाल्यानंतर त्यांना तीन महिने सक्तमजूरीची शिक्षा सुनावण्यात आली.[२१]

**7. आत्माराम शेटी वडार:** आत्माराम शेटी वडार यांचा जन्म १९१३ साली झाला. त्यांचे मूळ गाव आजच्या वाळवा तालुक्यातील कुरळप हे आहे. त्यांनी सातवीपर्यंत शालेय शिक्षण घेतले आणि पुढे स्वातंत्र्यलढयामध्ये अनन्यसाधारण योगदान दिले.

१९३० साली महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ पुकारल्यानंतर अनेक तरुणांनी त्यामध्ये उडी घेतली. खेडयापाडयातील अनेकांनी आपापल्या परिसरामध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ उभी केली.

बहुतांशी स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या परिसरामध्येच राहून कायदेभंगाच्या चळवळीमध्ये योगदान दिले. पण काही स्वातंत्र्यसैनिक देशप्रेमाने इतके भारावून गेले होते की, त्यांनी थेट मुंबई गाठली आणि देशपातळीवरील

कायदेभंगाच्या चळवळीमध्ये सहभाग घेतला. त्यातीलच एक नाव म्हणजे आत्माराम शेटी वडार. आत्माराम वडार यांनी सविनय कायदेभंग चळवळीमध्ये सहभागी होण्यासाठी थेट मुंबई गाठली आणि मुंबईमध्ये त्यांनी परदेशी कापड दुकानांवर कापडविक्रीस मज्जाव करत[२२] कायदेभंग चळवळीमध्ये आपला ठसा उमटवला. पण पुढे पोलिसांच्या कारवाईला त्यांना सामोरे जावे लागले. देशप्रेमासाठी चार महिने सक्तमजुरीची शिक्षा त्यांना सहन करावी लागली.

**8. विठूजी नामजी पाटील:** विठूजी पाटील यांचे मूळ गाव कुरळप. त्यांचा जन्म १९३५ साली झाला. पुढे इयत्ता सहावीपर्यंत त्यांनी शालेय शिक्षण घेतले. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीने ते प्रभावित होऊन त्यांनी स्वातंत्र्यचळवळीसाठी बौध्दिक देणाऱ्या अनेक सभांमध्ये भाग घेतला. पारतंत्र्यात गेलेला भारत स्वतंत्र व्हावा या प्रेरणेने प्रेरित होऊन त्यांनी अनेक मिरवणुकांमध्ये सहभाग घेत स्वातंत्र्याचा जयघोष केला.

**9. नानासाहेब गणपती पाटील:** १९०५ साली जन्मलेल्या नानांचे मूळ गांव कुरळप. नानांनी आपले शालेय शिक्षण इयत्ता सातवीपर्यंत पूर्ण केले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीमध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला. त्यावेळी सविनय कायदेभंग चळवळीमध्ये भाग घेण्यासाठी विविध मार्ग निवडण्यात आले होते. पैकी जंगल सत्याग्रह हा एक होता. जंगलातील गवत कापून कायदा मोडण्याचा हा प्रकार. नानांनी सविनय कायदेभंग चळवळीमध्ये सहभागी होत रेठरे धरण येथील जंगल सत्याग्रहामध्ये सहभाग घेत ब्रिटिश सरकारचा कायदा मोडून काढला.[२३] परिणामी ब्रिटिश सरकारच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागले. तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा व ५० रुपये दंड त्यांच्यावर ठोठावण्यात आला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९६६ साली वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना नानासाहेब पाटील यांना स्वातंत्र्यसंग्रामात केलेल्या कामगिरीबददल सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.[२४] अशा या देशप्रेमी स्वातंत्र्यसैनिकाचे निधन २८ ऑगस्ट १९६८ रोजी कुरळप येथे झाले.[२५]

**10. यशवंत रामजी पाटील:** यशवंत पाटील यांचा जन्म १९११ साली झाला. त्यांचे मूळ गाव कुरळप. त्यांनी इयत्ता सातवीपर्यंत शालेय शिक्षण घेतले. पुढे आपल्या आजूबाजूला सुरु असणाऱ्या स्वातंत्र्यलढयाचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि ते स्वातंत्र्यलढयाकडे आकर्षिले गेले, तो काळ होता सविनय कायदेभंग चळवळीचा. १९३० साली महात्मा गांधींनी पुकारलेल्या कायदेभंग चळवळीला खेडयापाडयातून प्रतिसाद मिळू लागला होता. अशाच एका कुरळप नावाच्या खेडयामध्ये यशवंत पाटील देशप्रेमाने भारावून जाऊन अनेक सभा-मिरवणुकांमध्ये स्वातंत्र्याचा जागर करू लागले होते.[२६]

**11. बळवंत भाऊ कोरे (गांधी काका):** बळवंत कोरे यांचा जन्म २ जानेवारी १८९७ रोजी वाळवा तालुक्यातील कुरळप येथे झाला.[२७] कुरळप येथेच त्यांनी शालेय शिक्षण घेतले. त्यांचे मूळ गाव आजच्या तासगांव तालुक्यातील बुर्ली हे आहे. बळवंत कोरे हे महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रेरित होऊन स्वातंत्र्यलढयामध्ये उतरले. महात्मा गांधीजींच्या शिकवणीने प्रेरित झालेले बळवंत कोरे नेहमी खादीची वस्त्रे वापरत. गांधीजींच्या शिकवणीत जगत. म्हणून लोक त्यांना गांधी काका म्हणत.[२८] ब्रिटिश साम्राज्यवादाचे प्रतीक ठरलेला चहा ते स्वत: पीत नसत व आपल्या कुटुंबालाही पिऊ देत नसत. अशा या गांधीवादी स्वातंत्र्यसैनिकाने १९३० सालच्या सविनय कायदेभंग चळवळीमध्ये सहभाग घेत स्वातंत्र्याचा संदेश देणाऱ्या अनेक सभांमध्ये भाग घेतला. मिरवणुकांमधून स्वातंत्र्याचा जयघोष केला. परिणामी या गांधीवादी स्वातंत्र्यसैनिकाला दोन रुपये दंड झाला. स्वाभिमानी बळवंत कोरेंनी दंड देण्यास नकार दिल्याने त्यांना दोन दिवसांची साधी कैद सहन करावी लागली.[२९] अशा या गांधीवादी स्वातंत्र्यसैनिकाला १५ ऑगस्ट १९६६ रोजी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील कामगिरीबददल सन्मानपत्र[३०] व ताम्रपट देऊन गौरविण्यात आले. या गांधीवादी स्वातंत्र्यसैनिकाचे निधन ६ ऑक्टोबर १९६९ रोजी कुरळप येथे झाले.

**मूल्यमापन:**

या शोधनिबंधातून असे दिसते की, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढयाने वेगळे वळण घेतले होते. या लढयात सर्वसामान्य माणूस प्राणपणाने सामील झाला होता. यातील सविनय कायदेभंगाची चळवळ हा एक महत्वाचा टप्पा होता. यात सर्व देश सामील झाला. पण इतिहासाच्या पानांमध्ये या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरच्याच नेतृत्वाची नोंद झालेली दिसते. पण कुरळप सारख्या एखाद्या खेडेगावातील तरुण या लढयात ओढले गेले आणि त्यांनी केलेली कामगिरी ही इतिहासात दुर्लक्षित व अज्ञात राहिली. त्यांची ही कामगिरी प्रकाशात आणून अशा अनेक उपेक्षित लहान-लहान गावांतील लोकांच्या स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाची नोंद व्हावी

हा या शोधनिबंधामागील उददेश आहे. तसेच ही कामगिरी प्रकाशात आणून अशा प्रकारच्या स्थानिक सहभागातूनच सविनय कायदेभंगाचा राष्ट्रीय इतिहास लिहिला गेला आहे हे शोधनिबंधातून अधोरेखित केले आहे.

**संदर्भ:**

१. प्राचार्य डॉ. एस. एस. गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद. पृ. क्र. ३३५
२. कित्ता, पृ. क्र.३३६
३. कित्ता, पृ. क्र.३३७
४. कु. अर्चना पांडुरंग पाटील, 'बिळाशी जंगल सत्याग्रह : एक ऐतिहासिक अभ्यास', एम.फिल. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. क्र. २२
५. कित्ता
६. कित्ता
७. कित्ता, पृ. क्र. ६७
८. यशवंतराव चव्हाण, कृष्णाकाठ, प्रेस्टीज पब्लीकेशन्स, ४६१/१, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे, पृ. क्र. ७४
९. उपरोक्त, एम.फिल. शोधप्रबंध, पृ. क्र. ८०
१०. कित्ता, पृ. क्र. १०१
११. कित्ता
१२. कित्ता, पृ. क्र. ९२
१३. डॉ. भ. ग. कुंटे, स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, पश्चिम विभाग, खंड ३, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. क्र. ९३७
१४. कित्ता, पृ. क्र. ९१६
१५. कित्ता, पृ. क्र. ९२७
१६. मुलाखत, पाटील सुभाष महादेव, २ फेब्रुवारी २०२३
१७. सन्मानपत्र, पाटील महादेव यशवंत
१८. ताम्रपट, पाटील महादेव यशवंत
१९. उपरोक्त, स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, पृ.क्र. ९८२
२०. कित्ता, पृ. क्र. ८३०
२१. कित्ता, पृ. क्र. ८६१
२२. कित्ता, पृ. क्र. १०१५
२३. कित्ता, पृ. क्र. ९१५
२४. सन्मानपत्र, पाटील नानासाहेब गणपती
२५. मुलाखत, पाटील प्रशांत, २ फेब्रुवारी २०२२
२६. उपरोक्त, स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, पृ.क्र. ९३०
२७. जनरल रजिस्टर, जि.प. शाळा नं. १, कुरळप
२८. मुलाखत, शेटे मालूताई बळवंत, ५ फेब्रुवारी २०२३
२९. उपरोक्त, स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, पृ.क्र. ७९३
३०. सन्मानपत्र, कोरे बळवंत भाऊ